# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १४/०२/२०१८

## मा. विशेष महासभा

मा. महासभा सुचना क्र. ०५

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ______________________
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा मंगळवार दि. २०/०२/२०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०५ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

## मा. विशेष महासभा दि. २०/०२/२०१८, सभा सुचना क्र. ०५

### विषयपत्रिका

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| 59 | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२९ (१)(अअ) नुसार "पाणी पुरवठा लाभ कर" लागु करणेस मंजुरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १६/१२/२०१७ प्रकरण क्र. ३१, ठराव क्र.३०) |
| 60 | पाणीपट्टी दरात व नविन जलजोडणी शुल्क व इतर दरात वाढ करणेबाबत. (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १५० प्रमाणे) (मा. स्थायी समिती सभा दि. १६/१२/२०१७ प्रकरण क्र. ३३, ठराव क्र. ३१) |
| 61 | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १३१(१)(a)(b) नुसार "मलप्रवाह कर" लागु करणेस मंजुरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ३०/१२/२०१७ प्रकरण क्र. 45, ठराव क्र. 42) |
| 62 | मालमत्ता कर आकारणी करीता भाडे मुल्याचे वाढीव दरास मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १२/०२/२०१८ (दि. ०३/०२/२०१८ रोजीची तहकुब सभा) प्रकरण क्र. ७५, ठराव क्र. ६५) |
| 63 | घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 अन्वये प्रत्येक घनकचरा निर्मितीकडून घनकचरा शुल्क लागू करणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १२/०२/२०१८ (दि. ०३/०२/२०१८ रोजीची तहकुब सभा) प्रकरण क्र. ७८, ठराव क्र. ६८) |
| 64 | भाडेतत्वावर आकारण्यात आलेल्या मालमत्तांच्या कर आकारणी बाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे (मा. स्थायी समिती सभा दि.14/02/2018 प्र.क्र. 91, ठराव क्र.78) |
| 65 | पुर्नविनीयोजन पत्रकास मान्यता देणेबाबत. |
| 66 | पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग) |
| 67 | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील वाहतुक नियंत्रण करणे कामी वाहतुक नियंत्रण शाखेच्या मदतीसाठी ट्राफीक वॉर्डन उपलब्ध करुन देण्याच्या खर्चास मान्यता देणे. |
| 68 | मिरारोड पूर्व व पश्चिम यांना जोडणारा रेल्वेवरील उड्डाण पुल बांधणेबाबत. |
| 69 | जागा भाड्याने देणेबाबत निर्णय घेणे. |
| 70 | लोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी दलितवस्ती सुधारणा योजना अंतर्गत अनुदान प्राप्त होण्यासाठी प्रस्तावित कामास मान्यता देणेबाबत. |
| 71 | भाईंदर (प.), भाईंदर उत्तन रोडवरील सुभाषचंद्र बोस जलकुंभ ते डोंगरी पंपिंग स्टेशन पर्यंत मुख्य (फिडरमेन) 600 मी.मी. व्यासाची मृदु पोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. |
| 72 | परिवहन समितीवर सदस्यांची नेमणूक करणेबाबत. |
| 73 | महिला व बालकल्याण समितीमार्फत 08 मार्च जागतिक महिला दिनानिमित्त 100 महिलांना रिक्षाकरीता कर्ज उपलब्ध करणेबाबत. |
| 74 | मिरा भाईंदर महानगरपालिका विकास आराखडा बाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे. |

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- १४ फेब्रुवारी, २०१८

मा. विशेष महासभा दि. २०/२/१८ प्र.क्र. - ५८ करिता

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. १६/१२/२०१७

**प्रकरण क्र. ३१ :-** **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२९ (१) (अअ) नुसार "पाणी पुरवठा लाभ कर" लागू करणेस मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग )**

**ठराव क्र.** ३० **:-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राचा विकास झपाटयाने होत आहे. त्यामुळे पाणी पुरवठयासारख्या अत्यावश्यक सेवेवरती ताण येत आहे. वाढत्या विकासामुळे पाणी पुरवठा अपुरा पडत आहे. सदर विकसीत होणाऱ्या भागास पाणी पुरवठा सोई व सुविधा देणेकरीता महानगरपालिकेकडून प्रकल्प हाती घ्यावे लागतात व सदरचे प्रकल्प हाती घेणकरीता महानगरपालिकेस कर्ज स्वरुपात निधी जमा करणे गरजेचे असते व सदर प्रकल्पाकरीता घेण्यात येणाऱ्या कर्ज स्वरुपातील निधिची परतफेड वेळोवेळी होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत मिरा भाईंदर शहराकरीता ७५ द.ल.ली. पाणी पुरवठा योजना मंजूर केली असून या प्रकल्पाचा खर्च रु. २६९.६२ कोटी आहे. सदर योजनेसाठी राज्य शासनाचा हिस्सा रु. १६७.४४ कोटी असून महानगरपालिकेचा हिस्सा रु. १०२.१८ कोटी इतका आहे. महानगरपालिकेने सदर योजनेसाठी रु. ५४.०० कोटी इतके कर्ज एम.एम.आर.डी.ए. कडून काढण्यात आले असून त्याचा वार्षिक हप्ता रु. ६.३५ कोटी इतका आहे. पाणी पुरवठा विभागाचे सन २०१६-१७ वर्षाचा महसुली जमा रु. ५०.४१ कोटी इतका आहे व महसुली खर्च इतका रु. ६२.९५ कोटी असून तफावत रु. १२.५४ कोटी इतकी आहे. मिरा भाईंदर शहराची भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेता सुर्या प्रकल्पातून २१८ द.ल.ली. पाणी पुरवठा प्रकल्प हाती घेणार आहे. सदर प्रकल्पाची किंमत अंदाजे रु. ४०० कोटी इतकी आहे.

पाणी पुरवठयाच्या सुविधा पुरविण्यासाठी आणि त्यात सुधारणा करण्यासाठी भांडवली कामांवर केलेल्या किंवा करावयाचा संपुर्ण खर्च किंवा त्याचा काही भाग भागविण्यासाठी महानगरपालिकेला आवश्यक वाटेल एवढया त्या कामांच्या कर योग्य मुल्यांच्या टक्केवारीने आकारावयाची "पाणी पुरवठा लाभ कर" या नावाने ओळखली जाणारी अतिरीक्त पाणी पाणीपट्टी महाराष्ट्र प्रांतिक अधिनियमचे कलम १२९ (१) (अअ) नुसार आकरणे शक्य आहे. व हा कर लागू करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे. तरी उक्त तरतुदीनुसार ८ टक्के पाणीपुरवठा कर लागु केल्यास या कराच्या रुपाने महानगरपालिकेस वाढीव उत्पन्न मिळू शकेल. व येणाऱ्या उत्पन्नातुन पाणी पुरवठा योजना सारखे प्रकल्प मार्गी लावणे शक्य होईल. करीता वरीलप्रमाणे "पाणी पुरवठा लाभ कर" लागू करणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदन :- श्री. अशोक तिवारी**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. पाटील ध्रुवकिशोर नन्साराम | १ | श्रीम. अनिता जयवंत पाटील | निरंक |
| २ | श्री. व्यास रवि वासुदेव | २ | श्रीम. वंदना विकास पाटील | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | ३ | श्रीम. तारा विनायक घरत | |
| ४ | श्री. तिवारी अशोक सुर्यदेव | ४ | श्रीम. नुरजहा नजर हुसैन | |
| ५ | श्री. दळवी प्रशांत ज्ञानदेव | ५ | श्री. जुबेर इनामदार | |
| ६ | श्रीम. रावल मेघना दिपक | | | |
| ७ | श्री. खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ८ | श्री. विरानी अनिल रावजीभाई | | | |
| ९ | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | | | |

ठराव बहुमताने मंजूर

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. विशेष महासभा दि. २०/२/१८ प्र.क्र. ६० करिता

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. १६/१२/२०१७

**प्रकरण क्र. ३३ :-** **पाणीपट्टी दरात वाढ करणेबाबत. (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १५० प्रमाणे)**

**ठराव क्र.** ३१ **:-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेस दररोज स्टेम प्राधिकरणाकडून ८६ द.ल.लि. व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून ९० द.ल.लि. असा एकूण १७६ द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठा आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पाणीपट्टी घरगुती जलजोडण्यांना १० पैसे प्रति लिटर व वाणिज्य जलजोडण्यांना ४० पैसे प्रति लिटर या दराने एप्रिल २०१५ पासून आकारण्यात येत आहे. सदर पाणीपट्टी दरात गेल्या दोन वर्षापासून कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही.

महानगरपालिकेस दररोज शहाड-टेमघर (स्टेम) पाणी पुरवठा प्राधिकरणाकडून व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पाणी पुरवठा होतो. या पाणी पुरवठ्याबाबत स्टेम प्राधिकरणास रु.१०,९५०/- प्रति द.ल.लि. पाणी देयक अदा करावे लागत आहे. तर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास चे दर रु.९,०००/- प्रति द.ल.लि या दराने पाणी देयके अदा करावे लागते. सदर पाणी देयक विहीत मुदतीत अदा करणे आवश्यक असते. सदर देयकापोटी प्रदान करावयाची रक्कम व इतर पाणी पुरवठा वितरणाबाबतचा खर्च तसेच रिलायन्स एनर्जी, टाटा पॉवर कंपनी व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेकडील वीज दरात मोठ्या प्रमाणात झालेली दरवाढ, साकेत व कापुरबावडी येथील पाणी पंपिंग करणे व आस्थापनावरील खर्च या सर्व बाबींचा विचार करता पाणीपट्टी दरवाढ करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेला आता सरासरी १७६ द.ल.लि. पाणी पुरवठा केला जातो. सदर पाणी पुरवठा सरासरी २४ ते २८ तासांतून केला जातो. शहरातील लोकसंख्या वाढीचा वेग जास्त आहे. त्यामुळे नविन पाणी पुरवठा योजना हाती घेणे आवश्यक आहे.

शहराच्या लोकसंख्या वाढीचा वेग जास्त आहे. त्याअनुषंगाने मिरा-भाईंदर महानगरपालिकेस सुर्या धरणातून मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणाच्या कोटयातुन ११८ द.ल.लि. व जलसंपदा विभागाच्या कोटयातुन १०० द.ल.लि. असे एकुण २१८ द.ल.लि. प्रतिदिन पाणी मंजुर आहे. मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणाने ४०३ द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेची सुर्या प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना तयार केलेली आहे. सदर योजने अंतर्गत मिरा भाईंदर शहराच्या हद्दीपर्यंत पाणी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. यासाठी निधी महानगरपालिकेला उभारावा लागणार असल्याने या भांडवली खर्चाची व्यवस्था आतापासून करावी लागणार आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढ झाल्यास कर्ज घेण्याची क्षमता देखील वाढेल व त्यानुसार आवश्यक कर्ज निधी प्राप्त होउ शकेल. सदर बाब विचारात घेता दरवाढ करणे क्रमप्राप्त आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका सध्या आकारत असलेले पाण्याचे दर खुपच कमी आहेत. मिरा-भाईंदर शहरातील नागरीकांना महानगरपालिका घरगुती जलजोडण्यांना १० पैसे प्रति लिटर व वाणिज्य जलजोडण्यांना ४० पैसे प्रति लिटर या दराने पाणीपट्टी आकारत आहे. मिरा भाईंदर शहराची भविष्यातील पाण्याची गरज कायम

स्वरुपी भागविण्याकरीता तसेच नविन पाणी पुरवठा योजना राबविणेकरीता प्रस्तावित केलेली पाण्याचे दर वाजवी आहेत. पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेवरील व इतर योजनेवरील खर्च लक्षात घेता होणारा खर्च व जमा बाजू यामध्ये सन २०१६-१७ अर्थसंकल्पानुसार मोठी तफावत येत आहे. सन २०१६-१७ पाणी पुरवठा महसुल खर्च ६८१७.७२ लक्ष व भांडवली खर्च १६६४२.६१ लक्ष एकुण खर्च रु.२३४६०.३३ लक्ष यंदा एवढा आहे. महसुल जमा ६७६५.१६ एवढी आहे.

मा. महासभा दि.३०/०३/२०१५ ठराव क्र. ९३ अन्वये पाणीपट्टी दर घरगुती १० पैसे प्रति लिटर, वाणिज्य ४० पैसे प्रति लिटर मान्यता दिलेली होती. परंतु सद्यस्थितीत वाढीव खर्च लक्ष घेता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १५० मधील तरतूदीनुसार पाणीपट्टी घरगुती १२ पैसे प्रति लिटर, वाणिज्य ५० पैसे प्रति लिटर दरवाढ करणेस, हि सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदन :- श्री. मोहन म्हात्रे**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्नाराम | १ | श्रीम. अनिता जयवंत पाटील | |
| २ | श्री. व्यास रवि वासुदेव | २ | श्रीम. वंदना विकास पाटील | |
| ३ | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | ३ | श्रीम. तारा विनायक घरत | |
| ४ | श्री. तिवारी अशोक सुर्यदेव | ४ | श्रीम. नुरजहा नजर हुसैन | |
| ५ | श्री. दळवी प्रशांत ज्ञानदेव | ५ | श्री. जुबेर इनामदार | निरंक |
| ६ | श्रीम. रावल मेघना दिपक | | | |
| ७ | श्री. खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ८ | श्री. विरानी अनिल रावजीभाई | | | |
| ९ | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | | | |

ठराव बहुमताने मंजुर

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. विशेष महासभा दि. २०/२/१८ प्र.क्र. ६७ करिता

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ३०/१२/२०१७

**प्रकरण क्र. ४४ :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १३१(१)(a)(b) नुसार "मलप्रवाह कर" लागू करणेस मंजूरी मिळणे बाबत. (दि. १६-१२-२०१७ रोजीचे तहकूब प्रकरण क्र. ३०)**

**ठराव क्र. ४१ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये कलम १३१(१)(a)(b) तरतुदीनुसार "मलप्रवाह कर" लागू करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे.

केंद्र शासनाने जेएनएनयुआरएम अंतर्गत मिरा भाईंदर शहराकरीता भुयारी गटार योजना मंजूर केली असून या प्रकल्पाचा खर्च रु. ४९१.९६ कोटी आहे. प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून योजनेचे ९५% काम पूर्ण झाले आहे. एकूण १० पैकी ६ मलनि:सारण केंद्रे कार्यान्वीत झाली असून मालमत्तेच्या मलनि:सारण जोडणीचे काम प्रगतीपथावर आहे. कार्यान्वीत मलनि:सारण केंद्रांची देखभाल व दुरुस्तीचा वार्षिक खर्च रु. ६.६० कोटी इतका आहे व मलनि:सारण केंद्राकरीता लागणाऱ्या वीजेचा वार्षिक खर्च रु. ९.०० कोटी एवढा आहे. असा एकूण रु. १५.६० कोटी वार्षिक खर्च असून प्रतीवर्षी त्यामध्ये सरासरी १०% वाढ अपेक्षीत आहे. मालमत्तेची मलनि:सारण जोडणी करण्यासाठी शहरातील मुख्य रस्त्यावरील मलवाहिनीपासून प्रत्येक इमारतीच्या प्रवेशद्वारा जवळ मलसंकलन (Sewer Collection) चेंबर बनविण्यात आले आहेत. सदर सुविधा नागरीकांचे राहणीमान उंचावण्यासाठी असल्यामुळे या सुविधेकरीता होणारा वार्षिक देखभाल व दुरुस्ती खर्च हा शहरातील नागरीकांकडून मलप्रवाह कर स्वरुपात आकारणी करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न अत्यंत कमी असल्याने शासनाकडील योजना राबविण्यासाठी निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे.

त्यामुळे शहरातील ज्या मालमत्तांना मलप्रवाह जोडणीची सुविधा उपलब्ध आहे केवळ अशाच मालमत्तांना "मलप्रवाह कर" आकारणे आवश्यक आहे. सबब उक्त तरतुदीनुसार करयोग्य मूल्याच्या ५% "मलप्रवाह कर" लागू केल्यास या कराच्या रुपाने महानगरपालिकेस वाढीव उत्पन्न मिळू शकेल. ज्या मालमत्ता धारकांना मलप्रवाह जोडणी झाली आहे त्याना १-४-२०१८ पासुन कर आकारणी करावी. व ज्या मालमत्ता धारकांची ऑगस्ट २०१८ मध्ये होणार आहे त्यांना मलप्रवाह एप्रिल २०१९ पासुन लागू करण्यात यावा. तरी याप्रमाणे "मलप्रवाह कर" लागू करणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदन :- श्री. मोहन म्हात्रे**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | १ | श्रीम. अनिता जयवंत पाटील | निरंक |
| २ | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | २ | श्रीम. वंदना विकास पाटील | |
| ३ | श्री. तिवारी अशोक सुर्यदेव | ३ | श्रीम. तारा विनायक घरत | |
| ४ | श्री. दळवी प्रशांत ज्ञानदेव | ४ | श्रीम. नुरजहा नजर हुसैन | |
| ५ | श्रीम. रावल मेघना दिपक | ५ | श्री. जुबेर इनामदार | |
| ६ | श्री. खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ७ | श्री. विरानी अनिल रावजीभाई | | | |
| ८ | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | | | |

ठराव बहुमताने मंजुर

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. विशेष महासभा दि २०/२/१८ प्र.क्र- ६२ करिता

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. १२/०२/२०१८
## (दि. ०३/०२/२०१८ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ७५ :- मालमत्ता कर आकारणी करीता भाडेमुल्याचे वाढीव दरास मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १६/१२/२०१७ रोजीचे तहकुब प्रकरण क्र.३२, दि. ३०/१२/२०१७ रोजीचे तहकुब प्रकरण क्र.४५ व दि. १५/०१/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र.५७)**

**ठराव क्र. ६५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सातत्याने लोकसंख्या वाढत आहे. तसेच मिरा भाईंदर शहर रेल्वे व बसेस द्वारे मुंबई शहराशी जोडले असल्याने शहरातून मोठ्या प्रमाणामध्ये लोक सदनिका/ घरे खरेदी करुन स्थलांतरीत होत असतात. शहराचा मोठ्या प्रमाणावर विकास होत असल्याने शहरातील जागा, फ्लॅट, दुकाने यांचे बाजार भावात त्याप्रमाणे वाढ होत आहे.

शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता शहरामध्ये विविध विकास कामे प्रस्तावित करण्यांत आलेली असून त्याअनुषंगाने भुयारी गटार योजना (कर्ज रक्कम रु. २२६.६५ कोटी), विकास आराखडयातील रस्ते बांधणी (कर्ज रक्कम रु. २३.३५ कोटी), जलवाहीनी अंथरणे (कर्ज रक्कम रु. ५६.१६ कोटी), ७५ द.ल.लि. पाणीपुरवठा योजना (कर्ज रक्कम रु. २८.५५ कोटी) आणी शहरातील रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण करणे करीता एमएमआरडीए कडे रु. १०० कोटीचे कर्ज मिळणेकरीता प्रस्ताव सादर केलेला असून कर्ज घेण्यांत आलेले आहे. सध्या घेतलेले कर्जाची परतफेड तसेच विकास कामांकरीता लागणारा निधी करीता महानगरपालिकेस उत्पन्नाचे स्त्रोत्र वाढविणेस अत्यावश्यक आहे.

महानगरपालिकेने यापुर्वी घेतलेले कर्ज व भविष्य काळातील विकास कामाकरीता घ्यावी लागणारी कर्जे याची परतफेड महानगरपालिकेच्या नविन उत्पन्नाच्या स्त्रोतातुनच करावी लागणार आहे. कर्जाची परतफेड, शहराच्या विकास कामासाठी उत्पन्न वाढविणे तितकेच आवश्यक होऊन बसले आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांना कर आकारणी करणेसाठी मा. महासभा ठराव क्र. ४३ दि. २१/०८/२००६ चे ठरावा नुसार दर निश्चित करण्यांत आले व त्याअनुषंगाने मालमत्ता कराच्या आकारणीकरीता दर ग्राहय धरुन मालमत्ता कराची आकारणी करण्यांत येते. सदर दरामध्ये दर चार वर्षांनी ५% टक्के वाढ करण्यात यावी असे नमूद केले आहे. परंतू आजमितीस ११ वर्षाचा कालावधी उलटुन देखील सदर दरामध्ये कोणतेही वाढ करण्यात आलेली नाही.

त्यानुसार यापुढे नविन विकसीत होणाऱ्या मालमत्तांना नविन कर आकारणी खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे दर ग्राह्य धरुन कर आकारणी करणेस उचित वाटते.

| अ. क्र. | विभागाचे नाव | इमारतीचा प्रकार | प्रती चौरस फुट प्रती महिना | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | जुने दर | | प्रस्तावित केलेले दर | |
| | | | रहिवासी वापरासाठी | बिगर रहिवासी वापरासाठी | रहिवासी वापरासाठी | बिगर रहिवासी वापरासाठी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मिरा रोड (पुर्व) भाईंदर पुर्व व पच्छिम | अ- आर. सी. सी. | रु.१.६० | रु.३.०० | रु.२.४० | रु.४.५० |
| | | ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु.१.४० | रु.२.५० | रु.२.१० | रु.३.७५ |
| | | क- माती विटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु.०.७० | रु.१.५० | रु.१.०५ | रु.२.२५ |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु.०.४० | - | रु.०.६० | - |

| अ. क्र. | विभागाचे नाव | इमारतीचा प्रकार | प्रती चौरस फुट प्रती महिना | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | जुने दर | | प्रस्तावित केलेले दर | |
| | | | रहिवासी वापरासाठी | बिगर रहिवासी वापरासाठी | रहिवासी वापरासाठी | बिगर रहिवासी वापरासाठी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| २ | घोडबंदर काशिमिरा, मिरा, पेणकरपाडा. चेणे वर्सोवा सर्व महामार्गालगत | अ- आर. सी. सी.<br>ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु<br>क- माती विटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती<br>ड- भिंती. झोपडी, कुडाच्या भिंती | रु.१.६०<br>रु.१.२०<br>रु.०.५५<br>रु.०.३५ | रु.३.००<br>रु.२.००<br>रु.१.००<br>- | रु.२.४०<br>रु.१.८०<br>रु.०.८३<br>रु.०.५३ | रु.४.५०<br>रु.३.००<br>रु.१.५०<br>- |
| ३ | घोडबंदर काशिमिरा, मिरा, महाजन पेणकरपाडा, चेणे वर्सोवा सर्व गावठाण | अ- आर. सी. सी.<br>ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु<br>क- माती विटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती<br>ड- भिंती झोपडी, कुडाच्या भिंती | रु.१.४०<br>रु.१.२०<br>रु.०.५५<br>रु.०.३५ | रु.२.८०<br>रु.२.४०<br>रु.१.००<br>- | रु.२.१०<br>रु.१.८०<br>रु.०.८३<br>रु.०.५३ | रु.४.२०<br>रु.३.६०<br>रु.१.५०<br>- |
| ४ | उत्तन | अ- आर. सी. सी.<br>ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु<br>क- माती विटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती<br>ड- भिंती झोपडी, कुडाच्या भिंती | रु.०.८५<br>रु.०.६५<br>रु.०.५५<br>रु.०.३२ | रु.१.५०<br>रु.१.२०<br>रु.०.८०<br>- | रु.१.२८<br>रु.०.९८<br>रु.०.८३<br>रु.०.४८ | रु.२.२५<br>रु.१.८०<br>रु.१.२०<br>- |
| ५ | राई मुर्धे, डोंगरी चौकी, मोर्वा | अ- आर. सी. सी.<br>ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु<br>क- माती विटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती<br>ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु.०.८५<br>रु.०.६५<br>रु.०.५५<br>रु.०.३२ | रु.१.५०<br>रु.१.२०<br>रु.०.८०<br>रु. - | रु.१.२८<br>रु.०.९८<br>रु.०.८३<br>रु.०.४८ | रु.२.२५<br>रु.१.८०<br>रु.१.२०<br>रु. - |
| ६ | काजू पाडा चेणे वर्सोवा, माश्याचा पाडा, काशी, मिरा-गावठण, महाजनवाडी, घोडबंदर, आदिवासी पाड्यामधील आदिवासी कुटुंबे. | क- माती विटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती<br>ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु.०.०५<br>रु.०.०५ | -<br>- | रु.०.०८<br>रु.०.०८ | -<br>- |
| ७ | मोठमोठी हॉटेल्स, रिसॉर्ट, सिनेमागृह मॉल्स, शॉपींग सेंटर इ. (फक्त वाणिज्य वापराकरीता असलेले) | अ- आर सी. सी. | - | रु.५.०० | - | रु.७.५० |
| ८ | हॉटेल सह लॉजींग बोर्डीग,सार्व. हॉल, मंगल कार्यालये, लॉन्स, | अ- आर सी. सी.<br>ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | -<br>- | रु.५.००<br>रु.४.०० | -<br>- | रु.७.५०<br>रु.६.०० |
| ९ | व्यावसायीक वापर असलेल्या मोकळ्याजागा | | - | रु.५.०० | - | रु. ७.५० |
| १० | व्यावसायीक वापर नसलेल्या परिवेष्ठीत केलेल्या मोकळ्याजागा | | | - | | - |
| ११ | महानगरपालिका क्षेत्रातील शाळा/कॉलेज/ शैक्षणिक संस्था. | अ- आर. सी. सी. | रु.१.६० | - | - | रु. २.४० |

तरी यापुढे महानगरपाल्किा हद्दीतील मालमत्तेस नविन कर आकारणी करताना वरिल तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे नविन दरानुसार कर आकारणी करण्यांत यावी व ज्या शिक्षण संस्थेच्या स्वतंत्र इमारती असतील त्या शिक्षण संस्थांच्या मालमत्ता करावर ५०% सुट दयावी. तसेच ३१ मार्च २०१८ पर्यंत ज्यांचे

अर्ज कर आकारणीसाठी मनपास प्राप्त झाले आहेत, त्यांना सदर दरवाढ लागु होणार नाही. दि. १-४-२०१८ नंतरच्या अर्जांला दरवाढ लागु होईल असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदन :- श्री. अनिल विराणी**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | १ | श्रीम. अनिता जयवंत पाटील | निरंक |
| २ | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | २ | श्रीम. वंदना विकास पाटील | |
| ३ | श्री. व्यास रवि वासुदेव | ३ | श्रीम. तारा विनायक घरत | |
| ४ | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | ४ | श्रीम. नुरजहा नजर हुसैन | |
| ५ | श्री. दळवी प्रशांत ज्ञानदेव | ५ | श्री. जुबेर इनामदार | |
| ६ | श्रीम. रावल मेघना दिपक | | | |
| ७ | श्री. खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ८ | श्री. विरानी अनिल रावजीभाई | | | |
| ९ | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मा विशेष महासभा दि. २०/२/१८ प्रक्र. ६३ करिता

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. १२/०२/२०१८

## (दि. ०३/०२/२०१८ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ७८ :- घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 अन्वये प्रत्येक घनकचरा निर्मितीकडून घनकचरा शुल्क लागू करणेबाबत.**

ठराव क्र. ६८ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई करणे, तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 अन्वये शहरातील दररोज निर्माण होणारा घनकचरा सुका कचरा व ओला कचरा याप्रमाणे स्वतंत्ररित्या वाहतुक करणे कामी आवश्यक लागणारे कंत्राटी सफाई कामगार व विविध क्षमतेची बंदीस्त वाहने भाड्याने घेणे. या कामाची सन 2018-19 या आर्थिक वर्षाकरीता नव्याने प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. याकामी वॉर्ड साफसफाई या लेखाशिर्षा अंतर्गत रु. 128.00 कोटी वार्षिक खर्च अपेक्षित आहे.

घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 मधील तरतुदीनुसार सदर कचरा निर्मिती करणाऱ्या नागरीकांनी महानगरपालिकेस घनकचरा व्यवस्थापनाकरीता व्यवस्थापन शुल्क देणे बंधनकारक आहे. असे नमुद केलेले आहे.

सार्व. आरोग्य विभागातर्फे शहरातील दैनंदिन रस्ते, गटार सफाई करणे, निर्माण होणारा घनकचरा गोळा करून वाहतुक करणे याकरीता नव्याने निविदा मागविणेबाबत मा. महासभेकडे प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार येणारा अंदाजे वार्षिक खर्च रु. 128.00 कोटी अपेक्षित आहे.

याकरीता शहरातील दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई तसेच घनकचरा वाहतुक याकामी येणाऱ्या वार्षिक प्रस्तावित रु. 128.00 कोटी खर्च घनकचरा शुल्क रुपाने नागरीकांकडून लागू करून वसूल करणे कामी प्रशासनाने खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केलेला आहे.

| रु. 128,00,00,000/- प्रस्तावित खर्च | |
|---|---|
| **Residential** | **Commercial** |
| रु. 64,00,00,000/- | रु. 64,00,00,000/- |
| 2,73,809 एकुण मालमत्ता | 59639 एकुण आस्थापना |
| रु.2,337/- वार्षिक शुल्क | रु. 10,731/- वार्षिक शुल्क |
| 12 महिने | 12 महिने |
| रु. 195/- प्रती महिना शुल्क | रु. 894/- प्रती महिना शुल्क |

प्रशासनाने वरीलप्रमाणे प्रस्तावित केलेले घनकचरा व्यवस्थापन शुल्क जास्त असून त्याप्रमाणे आकारणी केल्यास ते नागरीकांवर अन्यायकारक होईल. तथापि, सदरचे शुल्क वसूल करणे आवश्यक असल्याने खालीलप्रमाणे घनकचरा व्यवस्थापन शुल्क लागू करून मालमत्ता कराच्या बिलामध्ये समाविष्ट करून वसुल करणेस मा. स्थायी समिती मंजुरी देत आहे. तसेच सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे मंजुरीसाठी सादर करणेस शिफारस करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | निवासी मालमत्ता | रु. 1/- प्रती चौ.फुट दराने (जास्तीत जास्त रु. 2000/- वार्षिक) |
| 2 | शाळा/महाविद्यालयाच्या मालमत्ता | रु. 1/- प्रती चौ.फुट दराने (जास्तीत जास्त रु. 10000/- वार्षिक) |
| 3 | मॉल/ Theater | रु. 1/- प्रती चौ.फुट दराने (क्षेत्रफळाप्रमाणे) |
| 4 | लॉजींग/बोर्डींग | रु. 1/- प्रती चौ.फुट दराने (क्षेत्रफळाप्रमाणे) |

| | | |
|---|---|---|
| **5** | **अनिवासी मालमत्ता** | **रु. 1.50/- प्रती चौ.फुट दराने**<br>**1 ते 5000 चौ.फुट (जास्तीत जास्त रु. 5000/- वार्षिक)**<br>**5001 ते 10000 चौ.फुट (रु. 7500/- वार्षिक)**<br>**10001 ते 20000 चौ.फुट (रु. 10000/- वार्षिक)**<br>**20001 चौ.फुट वरील मालमत्ता (रु. 15000/- वार्षिक)** |
| **6** | **हॉटेल/ रेस्टॉरंट/ बॅक्वेट हॉल** | **रु.3/- प्रती चौ.फुट दराने**<br>**1 ते 1000 चौ.फुट (जास्तीत जास्त रु. 3000/- वार्षिक)**<br>**1001 ते 3000 चौ.फुट (जास्तीत जास्त रु. 5000/- वार्षिक)**<br>**3001 चौ.फुट वरील मालमत्ता (जास्तीत जास्त रु. 10000/- वार्षिक)** |

**टिप :- ज्या मालमत्तेचा निवासी वा बिगरनिवासी जागेचा वापर होत नसेल त्या मालमत्तेंना त्या कालावधीकरीता सुट द्यावी लागेल.**

सुचक :- श्री. अनिल विराणी          अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | १ | श्रीम. अनिता जयवंत पाटील | |
| २ | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | २ | श्रीम. दिप्ती शेखर भट | |
| ३ | श्री. व्यास रवि वासुदेव | ३ | श्रीम. वंदना विकास पाटील | |
| ४ | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | ४ | श्रीम. तारा विनायक घरत | |
| ५ | श्री. दळवी प्रशांत ज्ञानदेव | ५ | श्रीम. नुरजहा नजर हुसैन | निरंक |
| ६ | श्रीम. रावल मेघना दिपक | ६ | श्री. जुबेर इनामदार | |
| ७ | श्री. खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ८ | श्री. विरानी अनिल रावजोभाई | | | |
| ९ | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मा. विशेष महासभा दि. २०/२/१८ प्र.क्र. ६४ करिता

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. १४/०२/२०१८

प्रकरण क्र. ९१ : भाडे तत्वावर आकारण्यात आलेल्या मालमत्तांच्या कर आकारणी बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे. (दि. १५-०१-२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ६५)

ठराव क्र. ७८ :

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये भाडेकरारनामा व्यतिरिक्त इतर मालमत्तांना मा. महासभेने ठरविलेल्या दरानुसार कर आकारणी करण्यंत येत आहे. तर प्रत्यक्ष भाडेकरारनामानुसार देण्यांत आलेल्या मालमत्तांना प्रत्यक्ष प्राप्त भाडयानुसार कर आकारणी करण्यांत येत आहे. त्यामुळे एकाच क्षेत्रफळाच्या मालमत्तांच्या कर आकारणी मध्ये खुप तफावत होते. नागरीकांच्या रोषाला सामोरे जावे लागत असून भाडे करारनामानुसार कर आकारणी केल्यास मालमत्ता धारकांस भाडयापासून मिळणारे उत्पन्न महानगरपालिका व इतर कराचा भरणा करावा लागत असल्यामुळे मालमत्ता धारकांस स्वतःच्या मालमत्तेवर नगण्य उत्पन्न मिळत आहे. परिणामी शहरातील उद्योग धंदयावर परिणाम होवून व्यावसायिक इतर ठिकाणी स्थलांतरीत होण्याच्या प्रमाणात खुप मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे त्यामुळे त्यावर अवलंबित असलेले छोटे-छोटे धंदे बंद होत आहेत. शहरात बेकारी वाढत आहे. तसेच हयामध्ये पळवाट निर्माण करणेकरीता जागामालक करारनामा बनविताना दोन वेगवेगळे करारनामा निर्माण करत आहेत. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण ८ नियम ७ नुसार करयोग्य मूल्य ठरविण्यासाठी वाजवी भाडयावर कर आकारणी करण्याची तरतुद करण्यांत आली आहे.

उपरोक्त बाब विचारात घेता महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कर आकारणीस सुसुत्रता येणे आवश्यक आहे. कर आकारणीचे दर वाजवी ठेवल्यास अनेक मालमत्ता कर आकारणीच्या जाळयात येऊन महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल. त्याकरीता बिगर निवासी मालमत्ता (मोबाई टॉवर व्यतिरिक्त) भाडयाने दिल्यास प्रत्यक्ष वार्षिक भाडयाच्या २०% इतके भाडे करयोग्य मुल्यासाठी वार्षिक भाडे गृहीत धरुन किंवा भाडेपट्टीने दिलेल्या बिगर निवासी मालमत्तासाठी रु. १०/- प्र.चौ.फु. हा दर मासिक भाडे करीता गृहीत धरुन (जे जास्तीचे असेल त्यानुसार) आकारणी केल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होऊन मालमत्ता धारकांस कर भरणे सोईचे होईल. सदर प्रस्तावाची अंमलबजावणी दि.१-४-२०१८ पासुन करण्यात यावी.

वरिल प्रमाणे कर आकारणी करताना प्रस्तावित दरानुसार कर आकारणी करण्यांत यावी. तसेच सन २००८ नंतर केलेल्या अनधिकृत बांधकाम भाडयाने दिल्यास त्यावर उपरोक्त दरानुसार शास्तीसह कर आकारणी करावी. ज्या निवासी मालमत्ता बिगर निवासी वापर करून भाडयाने दिल्यास त्यावरही शास्तीसह कर आकारणी करणेस ही सभा नंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सुचक :- (सुरेश खंडेलवाल)

अनुमोदक :- (रवि व्यास)

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. सर्वसाधारण सभा दि. २०/२/२०१८

(हस्तलिखित: विशेष)

## // गोषवारा //

प्रकरण क्र. ( ६५ ) :- पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देणेबाबत..

वरील विषयानुसार खालीलप्रमाणे तरतूदीचे पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे.

**महाराष्ट्र लेखासंहिता 1971 नमुना क्र.10 नियम 30(3)**

| | या शिर्षातून (FROM) | | | | | हया शीर्षात (TO) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | प्रधान गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान रुपये | आज तारखेपर्यंत रुपये खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान रुप-ये | आज तारखेपर्यंत रुपये खर्च | प्रस्वित वाढीची रक्कम | अभिप्राय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | आपत्ती व्यवस्थापन विभाग | सी.सी.टी.व्ही यंत्रणा कार्यान्वयीत करणे | 5,00,00,000/- | 7,54,000/- | 4,92,46,000/- | वाहन विभाग | अस्थायी आस्थापना ठेका वाहनचालक | 1.00 कोटी | 96,51,283/- | 30,00,000/- | मनपाच्या विविध विभागातील वाहनांवर तसेच अत्यावश्यक सेवेत ठेका वाहनचालक कार्यरत असून सदर लेखाशिर्षातील रक्कम संपुष्टात आल्याने **रु.30.00 लाख** इतकी रक्कम पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे. |
| | | | | | | | खाजगी गाडया भाडयाने घेणे | 1.00 कोटी | 97,91,279/- | 30,00,000/- | मनपाच्या विविध विभागातील वाहनांवर ठेका वाहने कार्यरत असून सदर लेखाशिर्षातील रक्कम संपुष्टात आल्याने मार्च अखेरपर्यंत **रु.40.00 लाख** इतकी रक्कम पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे. |
| २. | वाहन विभाग | सामान्य प्रशासन पेट्रोल इंधन/वाहन दुरुस्ती | 45,00,000/- | 27,80,356/- | 17,19,644/- | वाहन विभाग | खाजगी गाडया भाडयाने घेणे | | | 5,00,000/- | |
| 3. | | वाहन विमा रक्कम | 20,00,000/- | 9,27,184/- | 10,72,816/- | | खाजगी गाडया भाडयाने घेणे | | | 5,00,000/- | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | कर विभाग | मालमत्ता कर पुर्नमुल्यांकन | 1,00,00,000/- | - | 1,00,00,000/- | परिवहन उपक्रम | “ब” अंदाजपत्रकाकडे हस्तांतरण | 3,30,00,000/- | 3,30,00,000/- | 3,00,00,000/- | परिवहन विभागास वाहनचालक/वाहक इतर यांचे वेतनासाठी मालमत्ता कर पुर्नमुल्यांकन या लेखाशिर्षातून **रू. 50.00 लाख व** सी.सी.टी.व्ही यंत्रणा कार्यान्वयीत करणे या लेखाशिर्षातून **रू.2.50 कोटी** असे **एकूण रू.3.00 कोटी** पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे. |
| ५ | आपत्ती व्यवस्थापन विभाग | सी.सी.टी.व्ही यंत्रणा कार्यान्वयीत करणे | 5,00,00,000/- | 7,54,000/- | 4,92,46,000/- | | | | | | |
| ६ | आपत्ती व्यवस्थापन विभाग | सी.सी.टी.व्ही यंत्रणा कार्यान्वयीत | 5,00,00,000/- | 7,54,000/- | 4,92,46,000/- | विधी विभाग | दावे, खटले व इतर व्यवस्था खर्च | 40,00,000/- | 36,70,000/- | 15,00,000/- | विधी विभागासाठी दावे खटले किल फी इतर साठी **रू. 15.00 लाख** पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे. |
| ७ | सार्वजनिक बांधकामे | घोडबंदर किल्ला सुशोभिकरण | 5,00,00,000/- | - | 5,00,00,000/- | आरोग्य साफसफाई व सोयी | वॉर्ड साफसफाई व नाले सफाई | 75.00 कोटी | 60.97 केटी | 10.00 कोटी | दैनंदिन साफसफसई व घनकचरा वाहतुक कामाची देयके प्रदानासाठी घोडबंदर किल्ला सुशोभिकरण करणे या लेखाशिर्षातून **रू.4.00 कोटी,** श्री.छत्रपती शिवाजी महाराज मार्ग या लेखाशिर्षातून **रू. 2.00** कोटी, स्मारक बांधणे/पुतळे उभारणे या लेखाशिर्षातून **रू. 3.00 कोटी**, भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी या लेखाशिर्षातून **रू. 1.00 कोटी** असे **एकूण रू.10.00 कोटी** पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे. |
| ८ | सार्वजनिक बांधकामे | श्री.छत्रपती शिवाजी महाराज मार्ग | 5,00,00,000/- | 282.02 लक्ष | 2,17,98,000/- | | | | | | |
| ९ | सार्वजनिक बांधकामे | स्मारक बांधणे/पुतळे उभारणे | 4,00,00,000/- | - | 4,00,00,000/- | | | | | | |
| १० | विशेष निधी | भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी | 5,00,00,000/- | 397.35 लक्ष | 1,02,65,000/- | | | | | | |
| ११ | सार्वजनिक बांधकामे | नगरसेवक स्वेच्छा निधी | 15,00,00,000/- | 386.11 लक्ष | 11,13,89,000/- | भांडवली डस्टबिन साहित्य वस्तू/वाहन खरेदी | | 85.00 लक्ष | - | 3.00 कोटी | शहरातील कचरा विलगीकरण करणेकामी डस्टबिन खरेदी करणेसाठी मा. महासभादि. 19/05/2017 ठराव क्र. 23 अन्वये सदरची रक्कम **रू. 3.00 कोटी** पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे. |

उपरोक्त पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता मिळणेस शिफारस आहे.

**(डॉ. नरेश गिते)**
**आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मि. भाईंदर महानगरपालिका

विशेष मा. महासभा दि.20/02/2018

बांधकाम विभाग

// गोषवारा //

प्रकरण क्र. ( ६६ ) :- पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देणे.

महाराष्ट्र लेखा सहीता 1971 नमुना क्र.10 नियम 30 (3)

| या शिर्षातुन | | | | | | ह्या शिर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | अभिप्राय |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 1 | सार्वजनिक बांधकामे (पृ.क्र.40) | नविन रस्ते बांधकाम | 2500.00 लक्ष | 1169.28 लक्ष | 900.00 लक्ष | परिवहन उपक्रम | भूसंपादन आगार बांधकाम इ. | 800.00 लक्ष | 800.00 लक्ष | 700.00 लक्ष | "नविन रस्ते बांधकाम" या लेखाशिर्षात रु.2500.00 लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली 31 मार्च 2018 पर्यंत होणारा खर्च पहाता सदर लेखाशिर्षातुन "भूसंपादन आगार बांधकाम इ." या लेखाशिर्षाखाली रु.700.00 लक्ष, "मनपा सार्व. / पोट निवडणुक" या लेखाशिर्षाखाली 200 लक्ष वर्ग होण्यास शिफारस आहे. |
| | | | | | | नगरसचिव (पृ.क्र.26) | मनपा सार्व. / पोट निवडणुक | 500.00 लक्ष | 405.41 लक्ष | 200.00 लक्ष | |

वरीलप्रमाणे पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देण्यास शिफारस आहे.

(डॉ. नरेश गीते)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

**मा. विशेष महासभा दि. 20/02/2018**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्र. ( ६७ )** :- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील वाहतुक नियंत्रण करणे कामी वाहतुक नियंत्रण शाखेच्या मदतीसाठी ट्राफीक वॉर्डन उपलब्ध करुन देण्याच्या खर्चास मान्यता देणे...

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील वाहतुक नियंत्रण करणेसाठी वाहतुक नियंत्रण शाखेमार्फत ट्राफीक वॉर्डन उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात येते. त्या अनुशंगाने मागील 7 वर्षापासुन महानगरपालिकेमार्फत वाहतुक नियंत्रण शाखेस 50 ट्राफीक वॉर्डन उपलब्ध करुन देण्यात येतात, सदर ट्राफीक वॉर्डन हे वाहतुक नियंत्रण शाखेच्या नियंत्रणाखाली काम करीत असतात. सद्यस्थितीत ट्राफीक वॉर्डन पुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत देण्यात आलेल्या कंत्राटाची मुदत ही दि. 04/01/2018 रोजी संपत असुन तत्पुर्वी निविदा प्रक्रीयेद्वारे नवीन कंत्राट देणे आवश्यक आहे. सन 2017-18 या वर्षाच्या अर्थसंकल्पात अस्थायी आस्था / सुरक्षा / होमगार्ड / ट्राफीक वॉर्डन या लेखाशिर्षाखाली रु.194.40/- लक्ष एवढी तरतुद करण्यात आलेली आहे. सदर कामासाठी वार्षिक रु.1.44/- कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. तरी ट्राफीक वॉर्डन नेमणे कामी तीन वर्षाच्या मुदतीसाठी निविदा मागविणेस नवीन निविदामागवुन कंत्राट देईपर्यंत जुन्या कंत्राटदारास मुदतवाढ देणेस व खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेस शिफारस आहे.

**(डॉ. नरेश गीते)**
**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-5/DK/2017-18/ MG-10

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. विशेष महासभा दि.२०/०२/2018

**बांधकाम विभाग**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक ( ६८ ) :-** मिरारोड पुर्व व पश्चिम यांना जोडणारा रेल्वेवरील उड्डाणपुल बांधणेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत मिरारोड पुर्व व पश्चिम यांना जोडणारा मिरारोड रेल्वेस्टेशन वरुन 30.00 मीटर रुंदीचा जोड रस्ता दर्शविण्यात आलेला आहे. भविष्यात सदर ठिकाणी उड्डाणपुल बांधणे आवश्यक असल्याने रेल्वे प्रशासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. रेल्वे स्टेशनच्या वरुन उड्डाणपुल बांधणेबाबत रेल्वेचे धोरण नसल्याने सदर जागा व्यवहार्य नाही असे रेल्वे प्रशासनामार्फत कळविण्यात आले आहे. मा. महासभा दि.3 ऑगस्ट 2004 ठराव क्र.28 च्या मान्यतेने मे. राईट्स लि. यांची मिरारोड उड्डाणपुल बांधणे कामासाठी सल्लागार नेमलेले आहे.

तथापी मा. महापौर यांनी दि.28/12/2017 रोजी पत्र देऊन मिरारोड जॉगर्स पार्क येथे पुर्व-पश्चिम यांना जोडणारा उड्डाणपुल बांधण्याचा गोषवारा मा. महासभेपुढे सादर करण्याबाबत कळविलेले आहे.

मा. महापौर यांनी सुचविलेल्या जागेबाबत सर्वेक्षण करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, विकास योजनेत सदर उड्डाणपुल व जोड रस्ते प्रस्तावित करणे इ. कामे करावी लागतील. तद्नंतर सदर प्रस्ताव पुढील मान्यतेसाठी मा. महासभेपुढे सादर करता येईल.

वरील वस्तुस्थिती सादर करण्यात येत आहे.

**(डॉ. नरेश गीते)**
**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-4/2017-18/DK/MG-10

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष महासभा दि. २०/०२/२०१८

## मिळकत विभाग

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक.** ( ६८ ) :- जागा भाडयाने देणेबाबत निर्णय घेणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे काशी येथे आरक्षण क्र. 365 व 367 या जागेत महानगरपालिकेचे समाजमंदिर व शेड आहे. सदर समाजमंदिर क्षेत्र 81.370 चौ.मीटर असुन शेडचे क्षेत्र 446.21 चौ.मीटर एवढे आहे. सदर जागा रिकामी आहे.

सदर जागा सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देण्यासाठी जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करुन अर्ज मागविण्यात आले होते. त्यानूसार मे. पराश ज्ञान शिक्षण प्रसारक मंडळ, मिरारोड (पुर्व) यांनी रु.60,000/- प्रति वर्ष ही सर्वात जास्त भाडे दराची निविदा सादर केलेली आहे. सदर संस्था ही मिरा भाईंदर महानगरपालिका परिसरात अनाथ, अक्षम पालकांसाठी, विधवा महीला, मुलां-मुली यांचे शिक्षण व निवासी संगोपन करीत असून त्यांना सवलतीच्या दरात जागेची शैक्षणिक कार्यासाठी नितांत आवश्यकता आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 (ग) मध्ये महानगरपालिकेच्या व शासनाच्या मान्यते सवलतीच्या दरात जागा भाडयाने देण्याची तरतूद आहे. तरी प्रस्तावित जागा भाडयाने देण्याकरीता मान्यता देण्यास शिफारस आहे.

**(डॉ. नरेश गीते)**
**आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

गोषवारा
मा. महासभा दि. २०/२/२०१८

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. ८१-** भाईंदर (प) भाईंदर उत्तन रोडवरील सुभाषचंद्र बोस जलकुंभ ते डोंगरी पंपिंग स्टेशन पर्यंत मुख्य (फिडरमेन) ६०० मी.मी. व्यासाची मृदु पोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. (पाणी पुरवठा विभाग)

सदर ठिकाणी महानगरपालिकेची ४०० मि.मी. व्यासाची मुख्य (फिडरमेन) जलवाहिनी अस्तित्वात आहे. सदरची जलवाहिनी फार जुनी असल्याने ५ ते ७ फुट खोलवर गेलेली असुन रस्त्याच्या मध्यभागी आहे. त्यामुळे सदर जलवाहिनी गळती झाल्यास दुरुस्ती करण्यास त्रासदायक होते. तसेच जलवाहिनी कमी व्यासाची असल्याने संबंधित परिसरातील पाण्याचे जलकुंभ भरण्यास लागणारा कालावधी जास्त लागतो. परिणामी वितरण व्यवस्थेवर त्याचा नाहक परिणाम होतो.

सदर भाईंदर (प) भाईंदर उत्तन रोडवरील सुभाषचंद्र बोस जलकुंभ ते डोंगरी पंपिंग स्टेशन पर्यंत या ठिकाणी ६०० मि.मी. व्यासाची मृदुपोलादी जलवाहिनी टाकल्यास डोंगरी, उत्तन, पाली, चौक या परिसरातील वितरण व्यवस्थेत सुधारणा होण्यास मदत होणार आहे. तसेच सुभाष चंद्र बोस मैदान ते डोंगरी पर्यंतच्या विकास आराखडाप्रमाणे रस्त्याचे क्रॉक्रीट रस्त्याचे निविदाचे काम एम.एम.आर.डी.ए. अंतर्गत अंतिम टप्प्यात आहे. सदर काम सुरु झाल्यानंतर अस्तित्वातील पाईप लाईन रस्त्याच्या मध्यभागी येणार आहे. त्याकरीता सदर काम तातडीने करणे आवश्यक आहे.

सदर कामी रक्कम रु.७,४९,६०,१२४/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेस तसेच संबंधित कामाकरीता त्रयस्थ लेखापरिक्षण (Third Party Audit) करीता आय.आय.टी. यांना तांत्रिक सल्लागार यांची नेमणुक करण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## परिवहन उपक्रम

**मा. विशेष महासभा दि. 20 / 02 /2018**

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. 02 :- परिवहन समितीवर सदस्यांची नेमणूक करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम स्थापन करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण 2 चे कलम 25(2) अन्वये परिवहन समितीवर सदस्यांची नेमणूक करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे तरतूद आहे.

कलम 25(2) - महानगरपालिकेने परिवहन उपक्रम संपादन किंवा स्थापन केल्यानंतर आपल्या पहिल्या सभेत महानगरपालिकेच्या मते ज्यांना प्रशासनाचा किंवा परिवहनाचा अनुभव असेल व अभियांत्रिका, औद्योगिक, वाणिज्यीक, वितीय किंवा कामगाराविषयक बाबतीत ज्यांची क्षमता दिसून आली असेल व जे पालिका सदस्य असतील वा नसतील अशा व्यक्तीमधून परिवहन समितीचे सदस्य म्हणून **बारा** व्यक्तींची नेमणूक केली पाहिजे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील वरील तरतुदीनुसार परिवहन समितीवर सदस्यांची नेमणूक करणेबाबत कायदेशीर कार्यवाही सुरु करावी असा मा.महासभा ठराव क्र. 26 दि.08/11/2017 पारित करण्यात आलेला आहे. तथापि, अधिनियमातील तरतुदीनुसार सदरचे सदस्य **महापालिका सदस्य असलेल्या अथवा महापालिका सदस्य नसलेल्या** अशा कोणूत्याही व्यक्तीमधून नेमणूक करावे याबाबत ठरावामध्ये उल्लेख केलेला नाही.

सबब, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार महापालिका सदस्य असलेल्या व्यक्तीमधून अथवा महापालिका सदस्य नसलेल्या व्यक्तीमधून परिवहन समितीवर सदस्य नेमणूक करणेबाबत धोरण ठरविणे आवश्यक आहे. परिवहन समितीवर नेमणूक करावयाचे सदस्य पालिका सदस्यांमधून घ्यावयाचे असल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 31(A) प्रमाणे कार्यवाही करावी लागेल. तसेच महापालिका सदस्य नसलेल्या व्यक्तीमधून घ्यावयाचे असल्यास त्याबाबतीत निकष ठरवून परिवहन समितीवर सदस्य मा.महासभेत निवडणूकीद्वारे घ्यावे लागतील. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**अ) पालिका सदस्य असलेल्या व्यक्तीमधुन नियुक्त करताना करावयाची कार्यपद्धती :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 31(A) नुसार प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती.

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2017 नुसार मान्यताप्राप्त पक्षांचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटाचे तौलानिक संख्या बळ विचारात घेऊन् खालीलप्रमाणे परिवहन समितीवर सदस्य नामनिर्देशन होतील.

| अ.क्र. | पक्ष/गट/आघाडी | सरासरी | प्रस्तावित सदस्य |
|---|---|---|---|
| 1 | भारतीय जनता पार्टी | 61 ÷ 95 X 12 = 7.70 | 8 |
| 2 | शिवसेना | 22 ÷ 95 X 12 = 2.77 | 3 |
| 3 | कॉंग्रेस लोकशाही आघाडी | 12 ÷ 95 X 12 = 1.51 | 1 |

**ब) पालिका सदस्य नसलेल्या व्यक्तीमधून नियुक्त करताना करावयाची कार्यपद्धती.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 25(2) नुसार परिवहन समितीवर नियुक्त करावयाचे सदस्य महानगरपालिका सदस्य नसलेल्या व्यक्तींमधुन घ्यावयाचे असल्यास महानगरपालिका सदस्यांव्दारे महासभेत गुप्त मतदान घेऊन निवडणूकीव्दारे नियुक्ती करावी लागेल. त्यानुसार परिवहन समितीवर नियुक्त करावयाचे सदस्यांकरीता अधिनियमतील तरतुदीनुसार निकषाप्रमाणे अर्ज मागवुन महासभेत गुप्त मतदान घेऊन निवडणूक प्रक्रिया घेण्यात येईल.

तरी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूचीत (D) प्रकरण (2)(1)(R) नुसार मा. महासभा ठराव क्र.26 दि.08/11/2017 मध्ये वरीलप्रमाणे फेरबदल करुन निर्णय घेणेस शिफारस आहे.

गोषवारा प्राप्त दि. 22/09/2018 वेळ 6.75
मा. ~~स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. 104
लिपीक
नगरसचिव विभाग.

(डॉ. नरेश गिते)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे, ४०१ १०१.

~~विशेष~~ महासभा दि :-२०/०२/२०१८

महिला व बालकल्याण विभाग

## ।। गोषवारा ।।

७३

**विषय १:- महिला व बालकल्याण समितीमार्फत ०८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त १०० महिलांना रिक्षाकरिता कर्ज उपलब्ध करणेबाबत..**

महिला रिक्षा(प्रवासी) ड्रायव्हर/मालक/मदतनीस उपक्रम राज्यातील महिला संरक्षण व सक्षमीकरण बाबतचा आहे. विशेषत महिलांची अडवणुक/संकुचितपणा/गैरफायदा घेण्याच्या घटना मोठया प्रमाणात वाढु लागल्या आहे. यासाठी महिलांना व व्यवसायाद्धारे समाजात आणुन त्याचा वावर वाढवून संकटांची मर्यादा कमी करुन धाडसीपणा आणणे गरजेचे आहे.

तसेच स्त्रीचे अस्तित्व चुल व मुल न राहता तिला हक्क बजावणीसाठी सर्व समावेशक बनविणे गरजेचे आहे. त्याचबरोबर संसाराचा गाडा चालविण्यासाठी आर्थिक दृष्टया स्वयंसिध्द व सक्षम केले पाहिजे

त्यासाठी संरक्षण व आर्थिक दृष्टया प्राप्तीसाठी सक्षमीकरण आधारावर प्रत्येक तालुक्यात महिलांना रिक्षा(प्रवासी) वाहतुक करण्याचे प्रशिक्षण देवुन रिक्षा चालविण्याद्धारे स्थानिक स्तरावर महिलांचे परिवहन सुरक्षित होण्यासाठी या उपक्रमाचे नियोजन आहे.

(अ) तरी सदर महिलांसाठी बॅटरीवर चालणारी ई-रिक्षा देण्याकरिता मंत्री सहकार, पणन व वस्त्रोद्योग महाराष्ट्र राज्य, मंत्रालय यांच्या निर्देश पत्रानुसार **इंडो-इस्त्राईल इंडस्ट्रिज चेंबर** याचेकडून रिक्षा घ्यावयाचे झाल्यास खालीलप्रमाणे अटीशर्तीची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१. सदर महिलांचे वय १८ ते ४५ असावे तसेच शिक्षण ८ पास इतके असावे
२. सदरची बॅटरीवर चालणारी ई-रिक्षा रक्कम रु.१,६५,०००/- इतकी आहे.
३. सदर रिक्षासाठी परमिट ची आवश्यकता नाही.
४. सदर रिक्षाकरिता महिलाना २५ टक्के रक्कम आगाऊ भरावी लागेल व ७५ टक्के फायन्सासाठी प्रस्ताव तयार करावा लागेल

(ब) **समाजविकास विभागामार्फत** रिक्षासाठी कर्ज दयावयास झाल्यास शासन निर्णक क्रमांक:- एनयुएल-२०१६/प्र.क्र.१७४/नवि-२० अन्वये सदर लाभार्थी हा खालील परिभाषेमध्ये समाविष्ट असावा.

१. भिकारी/चिंधी वेचणारे
२. घर कामगार
३. रस्त्यावरील विक्रेता/चर्मकार/फेरीवाला/रस्त्यावर काम करुन अन्य सेवा पुरविणारे
४. बांधकाम कामगार/नळ कारागिर/गवंडी/मजूर/रंगारी/सुरक्षा रक्षक हमाल/अन्य माथाडी कामगार
५. सफाई कामगार/स्वच्छता कामगार/माळी
६. गृह उद्योग-कामगार/कलाकार/हस्त व्यवसाय कामगार/शिंपी

७. वाहतुक कामगार/चालक/वाहक/चालकाचा वाहकाचा मदतनीस/गाडीवान/रिक्षा चालक

८. सदरचे कर्ज हे दिनदयाळ अंत्योदय योजना **राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत** स्वंयरोजगार कार्यक्रम अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात येईल आणि ७ टक्के वरील व्याजदरासाठी अनुदान लाभार्थीस अदा करण्यात येईल.

**राष्ट्रीय नागरी उपजीवीका अभियान अंतर्गत लाभार्थ्यांना कर्जासाठी निकष :-**

- लाभार्थी हा मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रहिवाशी असावा.
- लाभार्थी मागासवर्गीय जाती-जमाती व अल्पसंख्याक गटातील असावा.
- लाभार्थीकडे आधारकाड, पॅनकार्ड, मतदान ओळखपत्र तसेच पिवळा/केशरी रेशनकार्ड असावे.
- जातीचा व रहिवाशीचा दाखला असावा.

वरील 'अ' किंवा 'ब' प्रमाणे १०० महिलांना रिक्षाकरिता प्रशिक्षण व कर्ज देण्यास तसेच ०८ मार्च रोजी "जागतिक महिला दिन" निमित्त सदर १०० लाभार्थ्याची यादी जाहिर करावयाची आहे.

वरील प्रस्तावाबाबत विचार विनिमय होवून निर्णय घेण्यास शिफारस आहे.

**डॉ.नरेश गिते**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. १२/ ९ /२०१८ वेळ ४:१०
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ७०
लिपीक
नगरसचिव विभाग.

विशेष मा.महासभा दि. 20/02/2018

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## (बांधकाम विभाग)

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ( ७० )** :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलितवस्ती सुधारणा योजना अतंर्गत अनुदान प्राप्त होण्यासाठी प्रस्तावित कामास मान्यता देणेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेतंर्गत सन 2017-18 या वर्षासाठी अनुदान प्राप्त होण्यासाठी मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांनी प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविलेले आहे. अनुसुचित जातीच्या वस्तीमधील नागरीकांचे राहणीमान व स्तर उंचावण्याच्या दृष्टीने त्यांना मुलभुत सोयी पुरविणे आवश्यक आहे. सदर योजनेतंर्गत शासनाकडून 100% रक्कम अनुदान स्वरुपात प्राप्त होणार आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेत वॉर्ड क्र.11,12,13,14 हया मध्ये अनुसुचित जातीचा प्रवर्ग असून सदर वॉर्डातील खालील कामे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 1. | काजुपाडा केसरी पाडा येथे अंगणवाडी बांधणे. | रु.15,00,000/- |
| 2. | काजुपाडा केसरी पाडा येथे कल्वर्ट बांधणे. | रु.18,00,000/- |
| 3. | काजुपाडा शंभर पाडा येथे विहीर बांधणे. | रु.10,00,000/- |
| 4. | काजुपाडा शंभर पाडा कल्वर्ट बांधणे. | रु.20,00,000/- |
| 5. | काजुपाडा शंभर पाडा अंतर्गत सी.सी.रस्ते करणे. | रु.24,00,000/- |
| 6. | काजुपाडा केसरीपाडा येथील अंतर्गत सी.सी.रस्ते करणे. | रु.24,00,000/- |
| 7. | ठाणे घोडबंदर ते शंभर पाडा पर्यंत रस्ता बनविणे. | रु.20,00,000/- |
| 8. | घोडबंदर गाव येथील समाज मंदीराची पुर्न: बांधणी करणे. | रु.24,00,000/- |
| 9. | बाभळीचा भाट येथील समाजमंदीराची पुर्न: बांधणी करणे. | रु.24,00,000/- |
| 10. | घोडबंदर गाव ते घोडबंदर स्मशानभुमी पर्यंत सी.सी.रस्ता बनविणे. | रु.20,00,000/- |
| 11. | काजुपाडा केसरीपाडा येथे स्मशानभुमी बनविणे. | रु.15,00,000/- |
| 12. | शंभर पाडा येथे समाजमंदीर बांधणे. | रु.15,00,000/- |
| 13. | घोडबंदर गाव दत्त मंदीर ते रेतीबंदर पर्यंत गटार बांधणे. | रु.24,00,000/- |
| 14. | बाभळीचा भाट अंतर्गत सी.सी.रस्ते करणे. | रु.20,00,000/- |
| 15. | काशिगाव आदर्श विदयामंदीर ते मुख्य नालापर्यात नवीन गटार बांधणे. | रु.24,00,000/- |
| 16. | काजुपाडा केसरी पाडा येथील नाला बांधणे. | रु.24,00,000/- |

| | | |
|---|---|---|
| 17. | भाईंदर (पुर्व) नवघर येथील इंद्रप्रस्थ कॉम्पलेक्स मुख्य गेट पासुन शिवालयकडे जाणाऱ्या गटाराची पुर्न: बांधणी करणे. | रु.25,00,000/- |
| 18. | भाईंदर (पुर्व) नवघर येथील शिवशक्ती नगर पासुन सत्संगकडे जाणाऱ्या गटाराच्या स्लॅबची दुरुस्ती करणे. | रु.10,00,000/- |
| 19. | भाईंदर (पुर्व) रामलिला मेदानालगत गटाराची पुर्न:बांधणी करणे. | रु.5,00,000/- |
| 20. | भाईंदर (पुर्व) नवघर साईपुजा ते साईभक्ती इमारती पर्यंत गटाराची पुर्न:बांधणी करणे | रु.5,00,000/- |
| 21. | भाईंदर (पुर्व) नवघर गाव दत्तमंदीर रंगमंच्या पाठीमागील गटाराची पुर्न:बांधणी करणे. | रु.5,00,000/- |
| 22. | भाईंदर (पुर्व) नवघर स्वस्तिक अपार्ट. येथे गटाराची पुर्न:बांधणी करणे | रु.5,00,000/- |
| 23. | भाईंदर (पुर्व) इंदिरा नगर येथे गल्ली 4 व 5 गटार बनविणे. | रु.5,00,000/- |
| | **एकुण** | **रु.3,81,00,000/-** |

वरील कामे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती योजनेतंर्गत करण्यास मान्यता देणेस शिफारस आहे.

**(डॉ. नरेश गीते)**
**आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-VP /2017-18 /MG -03

गोषवारा प्राप्त दि 06/09/2018 वेळ 04:30
मा. ~~स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. 60
लिपिक 06/09/2018
नगरसचिव विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष महासभा दि.20/02/2018

## // अहवाल //

**प्रकरण क्र. (74)** :- <u>मिरा-भाईंदर महानगरपालिका विकास आराखड्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.</u>

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभेस विषयाधीन प्रस्तावाचा गोषवारा हा या कार्यालयामार्फत सादर करण्यात आलेली नाही तथापि त्याबाबत या कार्यालयाचा अहवाल हा मा. महासभेपुढे पुढील प्रमाणे सादर करीत आहे.

मिरा-भाईंदर शहराची विकास योजना ही शासन निर्णय क्र.टिपीसए-1296/847/प्र.क्र.162/96/नवि-12, दि.14/05/1997 अन्वये भागश: मंजूर झालेली असून, ती दि.15/07/1997 पासून अंमलात आलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना ही शासन निर्णय क्र.टिपीएस-1298/941/प्र.क्र.89-98/नवि-12, दि.25/08/2000 अन्वये मंजूर करणेत आलेली आहे.

मिरा-भाईंदर शहरासाठी उपरोक्त मंजूर विकास योजना सुधारित करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 23(1) व 38 अन्वये महानगरपालिकेने मा. महासभा ठराव क्र.76, दि.15/10/2015 अन्वये इरादा जाहीर केलेला असून, महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दि.26/12/2015 रोजी तसेच दि.19/11/2015 रोजीच्या "परशुराम समाचार" व "फ्री प्रेस जनरल" या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभेचे प्रकरण क्र.132, ठराव क्र.100, दि.18/01/2016 च्या अनुषंगाने मा. सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांनी पत्र क्र.वियो-मिरा भाईंदर मनपा/नर अधिकारी/नेमणूक/सहसंकोवि/320, दि.09/03/2016 पत्रान्वये मान्यता दिल्यानुसार सदरची विकास योजना सुधारित करणेसाठी, त्यासाठी संपूर्ण महानगरपालिका हद्दीतील क्षेत्राचे सर्व्हेक्षण करण्यासह विद्यमान जमिन वापर नकाशा तयार करणे व सुधारित विकास योजनेचे प्रस्ताव इ. कामे पूर्ण करुन महानगरपालिकेकडे सादर करणेकरीता मा. आयुक्त यांचे आदेश क्र.मिभा/मनपा/आयुक्त/358/2015-16 दि.10/03/2016 अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 24 अन्वये "नगररचना अधिकारी" म्हणून नगररचनाकार यांची नेमणूक करणेत आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 25 अन्वये मिरा-भाईंदर शहराचा विद्यमान जमीन वापर नकाशा (ELU) हा नगररचना अधिकारी तथा नगररचनाकार यांनी पत्र क्र. मनपा/नर/1434/2016-17, दि.24/06/2016 अन्वये आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचेकडे सादर केलेला आहे.

मिरा-भाईंदर शहराची विकास योजना सुधारित करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 23 खाली इरादा प्रसिध्द झाल्यानंतर, उक्त अधिनियमाच्या कलम 26 अन्वये प्रस्तावित जमीन वापर नकाशा (ELU) हा दोन वर्षांत (मुळ मुदत) प्रसिध्द होणे आवश्यक आहे. अन्यथा सदर प्रसिध्दी दिनांकापर्यंत उक्त अधिनियमाच्या कलम 26 प्रमाणे मा. महासभेचा मुदतवाढीचा ठराव घेऊन, शासनाकडे प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करणे आवश्यक आहे. मूळ मुदतीनंतर जास्तीत जास्त एक वर्षाची मुदतवाढ ही सबळ कारणांअंती अनुज्ञेय होवू शकेल.

सबब, मिरा-भाईंदर सुधारित विकास योजनेचे काम हे विहित मुदतीत पूर्ण होण्याचे दृष्टीने तत्कालिन नगररचना अधिकारी तथा नगररचनाकार यांनी सदरच्या सुधारित विकास योजना संबंधाने संपूर्ण संकलित माहिती, सदरच्या संकलित माहितीचे पृथ:करण अंती अनुमानित निष्कर्ष तसेच विचारात घेतलेले नियोजन प्रमाणके व सदर माहिती अंती प्राप्त सुधारित विकास योजनेबाबत तत्कालीन नगररचनाकार तथा नगररचना अधिकारी यांच्या कार्याकाळात केलेली कार्यवाही व अहवाल याबाबतची कागदपत्रे ही आवश्यक नकाशासह उलटटपाली आवश्यक त्या सर्व अभिलेखासह त्वरित सादर करणेबाबत श्री. दिलीप घेवारे, तत्कालीन नगररचनाकार तथा नगररचना अधिकारी यांना गोपनीय पत्र क्र. मनपा/नर/4176/2017-18, दि.05/02/2018 अन्वये मा. आयुक्त सो., यांचे मान्यतेने कळविण्यात आले होते.

तद्‌नंतर श्री. दिलीप घेवारे, तत्कालीन नगररचनाकार तथा नगररचना अधिकारी यांनी दि.07/02/2018 रोजी दोन बंद लिफाफे या कार्यालयाकडे सादर केलेली आहेत. सदरच्या दोन बंद गोपनिय लिफाफ्यांपैकी विकास योजना नकाशाचा एक बंद लिफाफा हा कायम बंद ठेवून दि.07/02/2018 रोजीचे गोपनिय पत्राचा लिफाफा हा मा. आयुक्त सो., मा. सहआयुक्त सो., सहा. संचालक, नगररचना व नगररचनाकार यांचे उपस्थितीत दि.14/02/2018 रोजी नगररचना कार्यालयात उघडणेत आला.

सदरच्या पत्रात तत्कालीन नगररचना अधिकारी, विकास योजना (सु.) यांनी पुढील प्रमाणे नमुद केलेले आहे.

"मिरा भाईंदर शहराची प्रथम सुधारित विकास योजना तयार करणेसाठी माझी संदर्भिय आदेश क्र. 1 अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 24 नुसार "नगररचना अधिकारी" म्हणून नियुक्ती करणेत आलेली असून त्याप्रमाणे विद्यमान जमिन वापर नकाशा तयार करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 25 अन्वये दि.24/06/2016 रोजी हस्तांतरीत केलेला आहे. त्यानंतर प्रक्षेपित लोकसंख्येस मा. सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांची दि.05/01/2017 रोजी मान्यता प्राप्त करुन सुधारित विकास योजनेचे प्रारुप तयार करणेत आलेले आहे तसेच सुधारित विकास योजना दि.26/12/2016 पर्यंत प्रसिध्द करणे आवश्यक होते तथापि कांहीसा विलंब झाल्याने प्रसिध्द होईपर्यंतच्या कालावधीसाठी शासनाकडून मुदतवाढ घेणे आवश्यक आहे.

सोबत (1) टिप्पणी व प्राप्त सुचनांचा गोषवारा, (2) नियोजन प्रमाणके व Deviation Statement, (3) विकास योजना अहवाल, (4) प्रारुप विकास नियंत्रण नियमावली, (5) प्रारुप विकास योजना नकाशा, गोपनियतेच्या कारणे लखोटाबंद करुन सादर करणेत येत आहे.

माझी बदली पुणे येथे झालेली असल्यामुळे पुढील कार्यवाहीसाठी कृपया नविन "नगररचना अधिकारी" यांची नेमणूक करावी, ही विनंती."

श्री. दिलीप घेवारे, तत्कालीन "नगररचना अधिकारी", विकास योजना (सु.), मिरा-भाईंदर यांना या महानगरपालिकेतून दि.10/10/2017 रोजी नगररचनाकार या पदावरुन कार्यमुक्त करणेत आलेले आहे. त्यामुळे "नगररचना अधिकारी", विकास योजना (सु.), मिरा-भाईंदर यांनी दि.07/02/2018 रोजीच्या गोपनीय पत्रान्वये सादर केलेला सुधारित विकास योजना नकाशा हा प्रसिध्द करणेकामी व तसेच सदरच्या सुधारित विकास योजनेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 नुसार पुढील वैधानिक कार्यवाही करणेकामी या कार्यालयाने मा. सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांचे कार्यालयाचे गोपनीय पत्र क्र. मनपा/नर/435/2017-18, दि.14/02/2018 अन्वये मार्गदर्शनासाठी प्रस्ताव सादर केलेला आहे व सदरचे मार्गदर्शन अद्याप अप्राप्त आहे. उपरोक्त बाब ही मा. महासभेपुढे अवलोकनार्थ सादर.

(बी.जी. पवार )
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. 9U/02/2018 वेळ
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ...CE...
नगरसचिव विभाग.